


www. sahyandrinews.com

दैनिक **सह्याद्रीचा राखणदार**

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे




• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७५ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२५ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# महादेव जानकर महायुतीतच राहणार ‘रासप’ला लोकसभेची एक जागा मिळणार

## ‘वर्षा’वर जानकरांनी घेतली शिंदे-फडणवीस-पवारांची भेट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर हे महायुतीमध्येच राहणार आहेत. महायुतीच्या वतीने रासपला एक जागा दिली जाणार असल्याची घोषणा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केली. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. यावेळी महादेव जानकर यांची देखील उपस्थिती होती.मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी अर्थात 'वर्षा' बंगल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या उपस्थितीत महादेव जानकर यांनी आज भेट घेतली. यावेळी त्यांनी महायुतीतच राहणार असल्याचे आश्वासन दिले. त्यानंतर या निर्णयाची घोषणा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केली.

सुनील तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्याशी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सविस्तर चर्चा केली. महादेव जानकर यांनी आपण महायुती सोबतच राहणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच देशाचा खऱ्या अर्थाने विकास झालाय आणि त्यांच्या नेतृत्वातच भारत विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल, त्यामुळे आपण मोदीजी यांच्यासोबत आहोत, असे त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाला लोकसभेची एक जागा देण्याचा निर्णय सुद्धा घेण्यात आला.यावेळी बोलताना महादेव जानकर म्हणाले की, मी महायुतीमध्येच होतो, त्यामुळे कुठेही गेलेलो नाही. रासपला एक जागा देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. महायुतीचा प्रत्येक उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण पूर्ण शक्तिनिशी सोबत राहू, असंही महादेव जानकर यांनी यावेळी सांगितले.गेल्या काही दिवसांपासून महादेव जानकर हे महायुती विशेष करून भाजपवर सातत्याने टीका करत होते. परंतु आज अचानक त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी ही घोषणा




करण्यात आली. दरम्यान, महादेव जानकर हे त्यांच्या 'रासप'च्या चिन्हावरच लोकसभेच्या मैदानात उतरणार आहेत. महायुतीकडून त्यांना एक जागा देण्याचे आश्वासन देखील देण्यात आले आहे. त्यामुळे महायुतीच्या प्रमुख तीन पक्षांच्या कोणाच्या खात्यातून जानकरांना मतदार संघ दिला जाईल, व कोणत्या जिल्ह्यात ते मैदानात उतरू शकतात, यावर अद्याप कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. परंतु येत्या दोन ते तीन दिवसांत त्यावर ठोस निर्णय घेतला जाईल, असे सुनील तटकरे यांनी सांगिंतले.

महाराष्ट्राच्या राजकारणात ट्विस्ट आलाय. कारण गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून छोट्या पक्षांना विचारात घेतलं जात नाही, अशी नाराजी दर्शवणारे रासप नेते महादेव जानकर यांनी महायुतीतच राहण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे महादेव जानकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे महादेव जानकर महाविकास आघाडीकडून लोकसभेची निवडणूक लढतील, अशी चर्चा होती.या सर्व चर्चांनंतर आता राजकारणात ट्विस्ट आणणारी घटना घडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. तसेच अजित पवार यांच्या गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. या बैठकीत जागावाटपाबाबत चर्चा झाली.यावेळी महादेव जानकर यांच्या पक्षाला एक जागा सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. ही बैठक सुरु असताना सुनील तटकरे आणि महादेव जानकर वर्षा बंगल्याच्या बाहेर आले. यावेळी त्यांनी याबाबतची माहिती दिली. महादेव जानकर हे परभणी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

# चंद्रपूर-गडचिरोली जिल्हा सीमेवर गोंडपिपरी पोलीस अलर्ट मोडवर

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोंडपिपरी पोलीस अलर्ट मोडवर आहेत. आचारसंहिता लागल्यापासून अवैद्य धंदे रोखण्यासाठी गडचिरोली - चंद्रपूर जिल्ह्याला जोडणाऱ्या आष्टी सीमेवरती नाकाबंदी लावण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर गोंडपिपरी तालुका हा तेलंगणा राज्याला लागून असल्याने तेलंगणा राज्याच्या सीमेवरती देखील येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी केली जात आहे .अवैद्य दारू वाहतूक करणाऱ्यांवर देखील कारवाईचा बडगा उभारला जात आहे.



गोंडपिपरी तालुका हा तेलंगणा सीमेवरील असून गोंडपिंपरी सीमा ही गडचिरोली जिल्ह्याला लागून आहे वैनगंगा आष्टी नदीपलीकडे गडचिरोली जिल्हा असून जिल्ह्यात दारू बंदी असल्याने छुप्या मार्गाने चंद्रपूर जिल्ह्यातून गडचिरोली दारू तस्करी मोठ्या प्रमाणात होत असते.नोटा,दारू आदींचा पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नदीकाठी टेंट टाकून कडक पहारा दिला जात आहे. शिवाय एसटी महामंडळाच्या बस आणि खाजगी वाहनांची तपासणी देखील केली जात आहे.गोंडपिपरीचे ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात आहे .पोलिसांचे कामकाज पाहण्यासाठी रोज ठाणेदार हत्तीगोटे सीमेवरती भेट देत आहे.

# चंद्रपूरच्या जागेचा तिढा सुटला प्रतिभा धानोरकर काँग्रेसच्या उमेदवार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**–काँग्रेसने आज रात्री चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर केली आहे. दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या पत्नी आमदार प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या जागेवरील उमेदवारीबाबत काँग्रेसमध्ये निर्माण झालेला तिढा आज अखेर सुटला. वरोऱ्याच्या आमदार प्रतिभा धानोरकर या चंद्रपूर लोकसभेसाठी नैसर्गिक उमेदवार मानल्या जात होत्या. परंतु चंद्रपूरमधून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांची मुलगी शिवानी वडेट्टीवार यांच्या उमेदवारीसाठी पक्षाकडे आग्रह धरला होता. त्यामुळे या जागेबाबत पक्षपातळीवरील तिढा निर्माण झाला होता. त्यानंतर या दोन्ही नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध देखील बघावयास मिळाले. या परिस्थितीत काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी विजय वडेट्टीवार यांना स्वत: लढण्यास सूचना केली. परंतु वडेट्टीवार स्वत: न लढता मुलीसाठी आग्रही होते. त्यामुळे अखेर पक्षश्रेष्ठींनी आज प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी जाहीर केली. हा मतदारसंघ चंद्रपूर, वणी आणि आर्वी असा विस्तारला आहे. चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्याचा यात समावेश असून दिवंगत बाळू धानोरकर यांनी गेल्या निवडणुकीत काँग्रेसला ही जागा जिंकून दिली होती.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला विजय मिळवता आलेली ही एकमेव जागा होत, हे येथे उल्लेखनीय. बाळू धानोरकर यांच्या निधनानंतर या जागेवर शिवानी वडेट्टीवार यांनी दावा करण्यास सुरुवात केली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी लोकसभा निवडणूक घोषणा होताच पक्षाकडे आपल्या मुलीसाठी ही जागा मिळावी यासाठी प्रयत्न केले होते. परंतु येथील जातीय समीकरण आणि दिवंगत नेत्या पत्नीला उमेदवारी देण्याचा परंपरा साजेसा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.काँग्रेसने जयपूरमध्ये सुनील शर्मा यांच्या ऐवजी प्रताप सिंह खाचरियावास यांना उमेदवारी दिली आहे. जयपूर लोकसभेची उमेदवारी सुनील शर्मा यांना देण्यात आली होती. परंतु ते कायम पक्षावर टीका करून पक्षांतर्गत वाद निर्माण करण्याचे प्रयत्न करीत असल्याचे दिसून आल्यावर त्यांना पक्षाने बदलण्याचा निर्णय घेतला. तर राजस्थानमधील दौसा येथून मुरारीलाल मीना यांना संधी देण्यात आली आहे. ही जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे.



## दादाजी राजेश्वर झोडे यांचे निधन



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील येनोली माल येथील प्रतिष्ठित शेतकरी गावातील सर्वांचे मनमिळावू स्वभावाचे दादाजी राजेश्वर झोडे (वय ६७) यांचे अल्पशा यांचे दि २४ मार्च रोज रविवार ला पहाटे ४:४२ वाजेच्या दरम्यान येनोली माल येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांचे पश्चात पती, एक मुलगा व सून पाच मुली व नातवंड बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवारी ला दुपारी १ वा येनोली माल येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या वाहनांची कडक तपासणी करा

## सीमेवरील पथकांना जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश ;पाटाळा आणि वणी येथील चेकपोस्टला भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संपूर्ण जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि नि:पक्षपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबध्द आहे. आदर्श आचार संहितेची प्रभावी अंमलबजावणी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात विविध पथकांचे गठन करण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जिल्ह्याच्या सीमेवर तैनात स्थायी निगराणी पथकांनी (एसएसटी) जिल्ह्यात प्रवेश करणा-या वाहनांची कडक तपासणी करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहे.

भद्रावती तालुक्यातील पाटाळा आणि वणी मतदारसंघातील सीमेवर असलेल्या चेकपोस्टला जिल्हाधिकारी गौडा यांनी भेट दिली. यावेळी वरोराच्या उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, उपविभागीय पोलिस अधिकारी नयोमी साटम, तहसीलदार योगेश कौटकर (वरोरा), अनिकेत सोनवणे (भद्रावती) आदी उपस्थित होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभुमीवर जिल्ह्याच्या सीमेवर स्थायी निगराणी पथक (एसएसटी) तैनात करण्यात आले आहे. पाटाळा (ता. भद्रावती) येथील पथकांची पाहणी करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्ह्यात प्रवेश करणा-या प्रत्येक वाहनांची कडक तपासणी झाली पाहिजे. यात कोणताही निष्काळजीपणा करू नये. चारचाकी वाहनाच्या डीक्कीसह वाहनाच्या सीटजवळील भागसुध्दा तपासावा. यात असणा-या बॅग्ज व इतर बाबींची तपासणी करावी. काही आक्षेपार्ह



आढळल्यास त्याबाबत संबंधित यंत्रणेला माहिती द्यावी. पूर्णपणे खात्री झाल्यावरच संबंधित वाहनाला प्रवेश द्यावा. तसेच तालुक्यातील वरीष्ठ अधिका-यांनी रात्री - बेरात्री चेकपोस्टवर अकस्मिकपणे भेट द्यावी, असे निर्देश दिले.यावेळी जिल्हाधिका-यांनी वरोरा - वणी मार्गावरील पाटाळा आणि वणी येथील चेकपोस्टला भेट दिली. किती जणांची टीम लावण्यात आली आहे, प्रत्येक टीममध्ये किती लोकांचा सहभाग असतो, प्रत्येक शिफ्टमध्ये काम करणा-यांच्या वेळापत्रक कसे आहे, आदी बाबींची माहिती जाणून घेतली. तसेच दोन्ही चेकपोस्टवरील अधिकारी व कर्मचा-यांनी ऐकमेकांना मोबाईल क्रमांक देऊन ठेवावे, जेणेकरून एखादे वाहन न थांबता सुसाट गेले आणि संशयास्पद वाटले तर त्याची माहिती लगेच दुस-याला देणे शक्य होईल. तत्पुर्वी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी वरोरा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात असलेल्या स्ट्राँग रुमची पाहणी करून या परिसराला बॅरिकेटींग करावे, तसेच स्ट्राँग रुम सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस विभागाने विशेष दक्ष राहावे, अशा सुचना त्यांनी दिल्या.१३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात एकूण ६२ स्थायी निगराणी पथकांचे (एसएसटी) गठन करण्यात आले आहे. यात राजुरा विधानसभा मतदार संघात १५, चंद्रपूर - ४, बल्लारपूर - ६, वरोरा - १२, वणी - १३ तर आर्णी विधानसभा मतदारसंघात १२ पथकांचा समावेश आहे. याशिवाय गडचिरोली लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात ८ तर चिमूर मतदारसंघात ४ एसएसटीचे गठण करण्यात आले आहे.

## सुट्टीची सुचना

उद्या दिनांक २५ मार्च २०२४ वार सोमवार रोजी धुलीवंदन असल्यामुळे दै.सह्याद्रीचा राखणदार कार्यालयास सुट्टी राहणार आहे यामुळे २६ मार्च २०२४ वार मंगळवार चा अंक प्रकाशित होणार नाही वाचकांनी याची नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक.

**वेगवेगळ्या फुलांनी सजवून बनविलेली आकर्षक रांगोळी सध्या चर्चेचा विषय बनली आहे. छाया :प्रणय बांगरे.**





***वरोरा येथील आनंदवन चौक स्थित श्री. जगन्नाथ बाबा मठ येथे होलिका दहन करण्यात आले त्यावेळी टिपलेले छायाचित्र :- अनिल वरखडे वरोरा***

# वसंताचा उत्सव-निसर्गोत्सव!

**हिन्दू दिनदर्शिकेप्रमाणे भारतात माघ आणि फाल्गुन या महिन्यांत वसंत ऋतू असतो. ग्रेगेरीयन दिनदर्शिकेप्रमाणे फेब्रुवारी उत्तरार्ध, मार्च-एप्रिल पूर्वार्ध या महिन्यांत तो असतो. काहींच्या मते त्याचे फाल्गुन आणि चैत्र हे महिने तर शाळांच्या क्रमिक पुस्तकांनुसार चैत्र आणि वैशाख हे महिने आहेत. भारत हा अतिविशाल देश असल्याने देशाच्या विविध भागांत त्यादरम्यान येणारे हिंदू महिने वेगळेवेगळे आहेत. या ऋतूमध्ये झाडाला पालवी फुटते. मात्र वसंत पंचमी- माघ शुद्ध पंचमीपासून वसन्तोत्सव सुरू होतो, हे देशभर मानले जाते. इंग्रजीमध्ये वसंत ऋतूला स्प्रिंग म्हणतात. युरोपात मार्च-एप्रिल हे महिने तर ऑस्ट्रेलियात सप्टेंबर ते नोव्हेंबर महिन्यांत त्याचे आगमन होते, म्हणतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखात वाचा रोचक व ज्ञानवर्धक माहिती... संपादक.**



वसंताचा उत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. तो या दिवसापासून सुरू होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग या ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. यौवन हा जर आपल्या जीवनातील वसंत असेल तर वसंत हे सृष्टीचे यौवन आहे. महर्षी वाल्मीकींनी रामायणात त्याचे अतिशय सुंदर व मनोहारी चित्रण केले आहे. भगवान श्रीकृष्णानेही गीतेत 'ऋतूनाम् कुसुमाकरः' असे म्हणत त्याची बिरुदावली गायली आहे. शिशिर ऋतूत पानगळ- झाडाची पाने वाळून गळून पडतात. ते यात जोमाने येतात, म्हणून वसंताचा उत्सव हे अमर आशावादाचे प्रतीक आहे. त्याचा खरा पुजारी जीवनात कधी निराश होत नाही. जीवन व वसंत ज्याने एकरूप करून टाकले अशा मानवाला आपली संस्कृती संत म्हणते. ज्याच्या जीवनात वसंत फुलतो तो संत! तो यौवन आणि संयम, आशा आणि सिद्धी, कल्पना आणि वास्तव, जीवन आणि कवन, भक्ती व शक्ती, सर्जन व विसर्जन या सर्वांचा समन्वय साधणारा असतो. तसेच जीवनात सौन्दर्य, संगीत व स्नेह प्रकट करणारा वसंत आपल्या जीवनात साकार झाला तरच आपण त्याच्या वैभवाला जाणले, अनुभवले व पचवले, असे म्हणता येईल. अशा प्रभुस्पर्शींच्या जीवनात नेहमी एकच ऋतू असतो, तो म्हणजे वसंत! त्याची जीवनात एकच अवस्था कायम असते, ती म्हणजे यौवन! संत ज्ञानेश्वरजी महाराज वर्णन करतात-


जैसे ऋतुपतीचे द्वार। वनश्री निरंतर।। वोगळे फळभार। लावण्येसी।।

वसंतपंचमीला 'श्रीपंचमी' असेही म्हणतात. श्रीचा अर्थात लक्ष्मीचा हा जन्मदिवस म्हणून या पंचमीस श्रीपंचमी असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे श्रीसरस्वती पूजनोत्सवाचा हा दिवस असल्यामुळे सुद्धा श्रीपंचमी असे म्हणतात. बंगाली बांधव या दिवशी सरस्वतीच्या प्रतिमा पूजतात. सरस्वतीचा नवसही करतात. मुलांचा विद्यारंभ या तिथीपासूनच होतो. काही धर्मशास्त्रकारांच्या मते कामदेव व वसंत ऋतू यांचे निकटचे नाते पुराणांमध्ये वर्णिले आहे, त्यामुळे दिवशी कामदेव-रतीचीही पूजा व प्रार्थना करावी, अशी प्रथा आहे. तथापि त्याप्रीत्यर्थ खास देवालये नसल्यामुळे लक्ष्मी व विष्णू यांची विविध उपचारांनी पूजा व प्रार्थना करून हा दिवस साजरा करण्यात येतो. आपले पारिवारिक जीवन सुखाचे व समृद्धीचे जावे, यासाठी लोक कामदेव-रतीची पूजा करीत असावेत. काही ठिकाणी वसंतपंचमीला नवान्नेष्टी करतात. शेतातून नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्या देवतेला अर्पण केल्यानंतरच नवान्न भक्षण करावयाचे असते, असे सांगितले जाते. कारण-

आला वसंत ऋतू आला।
वसुंधरेला हसवायाला।।
सजवीत नटवीत लावण्याला।
आला, आला वसंत ऋतू आला।।

वसंतपंचमीपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत वसंतोत्सव साजरा करतात. प्राचीन काळी वसंत ऋतूच्या आगमनाप्रीत्यर्थ सुवसंतक, वसंतोत्सव, मदनोत्सव, अशोकोत्सव वगैरे उत्सव करण्याची प्रथा होती. या निमित्ताने नृत्य, संगीत, वनविहार, जलक्रीडा आदी मनोरंजनात्मक कार्यक्रम केले जात. काही ठिकाणी रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करून रंग व गुलाल उडवून हा वसंतोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. वसंत ऋतूमध्ये वृक्षलतांना नवी पालवी फुटते. त्या पानाफुलांनी बहरतात. त्याप्रमाणेच लोकांच्या मनोवृत्तीही उत्साही व आनंदी होऊ लागतात. हा उत्सव या संक्रमणस्थितीचा द्योतक आहे. निसर्ग-सृष्टीप्रमाणेच मानवी जीवनात आनंद व उत्साह वृद्धिंगत व्हावा, या उद्देशानेच हा उत्सव साजरा करण्याची प्रथा रुढ झाली असावी-

चोहीकडून तो वसंत येतो, हासत नाचत गाणे गातो!
चराचरांवर जादू करतो, मनामनाला फुलवीत येतो!
पक्षीकूजन मधुर ऐकू येते, आसमंत हा गुंगून जावा!
फुलाफुलांतून साद उमलते,वसंत घ्यावा, वसंत घ्यावा!



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

माघ शुक्ल पंचमी ही वसंतपंचमी म्हणून ओळखली जाते. वसंत ऋतूच्या शुभारंभाची ही तिथी होय. चैत्र व वैशाख हे वसंत ऋतूचे महिने मानले गेले आहेत, परंतु माघ महिन्यामध्ये उत्तरायणाबरोबर वसंताची चाहूल लागते व वातावरण उत्साहवर्धक होऊ लागते. ऋतुराज वसंताच्या आगमनाप्रीत्यर्थ पाच ऋतूंनी आपल्या कालावधीतील प्रत्येकी आठ दिवस भेट म्हणून दिले आहेत. पाच ऋतूंचे प्रत्येकी आठ दिवस मिळून झालेले हे चाळीस दिवस चैत्र बलिप्रतिपदेपूर्वी म्हणजे वसंतपंचमीपासून सुरू होतात, असे कविकल्पनात्मक स्पष्टीकरण दिले जाते. प्रारंभी हा दिवस वसंत ऋतूच्या संदर्भातच साजरा होत असावा. परंतु नंतर हिंदुधर्म शास्त्रकारांनी तसेच पुराणकारांनी वसंतपंचमीच्या उत्सवाशी काही धार्मिक कथा जोडलेल्या आढळतात. मात्र कविमन गाते-

हा वसंत रंग भरीत जगती येतसे पहा,
बहरल्या दिशा दहा!!
कोकिळा ही उपवनात, अमृत मधुर गीत गात!!
रम्य दिवस चांदरात, फिरत फिरत भृंग हा!!

वसंतपंचमीच्या दिवशी धार्मिक व्रतविधी फारसे नसतात. या सणाचे लौकिक अंग अधिक ठळकपणे उठून दिसते. वसंत ऋतूत निर्माण होणाऱ्या चैतन्यदायी वातावरणामुळे उल्हासित झालेल्या मनांचा आविष्कार विविध प्रकारच्या मनोरंजक कार्यक्रमांतून व्यक्त होतो. आनंदाचे प्रकटीकरण हाच या सणाचा उद्देश दिसतो. या दिवशी मुलांना कोणाच्याही बागेत जाऊन फळे तोडण्याची मुभा असते. काही ठिकाणी उत्साही मुले होळीसाठी लाकडे, गवत वगैरे गोळा करण्यास वसंतपंचमीपासून सुरुवात करतात. मंजुळ पक्षीरव ऐकतच-

नकोत मजला विविध सुरांचे कृत्रिम हे हिंदोळे।
कोकिळे ऐकव तव मधुर बोल।।
ऋतू वसंतातील कोकिळ कुहूकुहू बोले।
पांडुरंग आले आले।।

दक्षिण भारतापेक्षा उत्तर भारतामध्ये या सणाला विशेष महत्त्व आहे. राजस्थानमधील राजपूत बांधवांमध्ये हा उत्सव विविधप्रकारे उत्साहाने साजरा केला जातो. समाजातील सर्व थरांतील लोक यामध्ये सहभागी होतात. रथसप्तमी- राजस्थानातील भानुसप्तमीच्या दिवशी सूर्याची पूजा करून त्याच्या रथाची मिरवणूक काढण्यात येते. हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे. फाल्गुन महिन्यातील वसंतोत्सव 'फाग' या नावाने ओळखला जातो. फाल्गुन पौर्णिमेला वसंतोत्सव समाप्त होतो, असे सर्वसाधारण मत आहे. मात्र महाराष्ट्रात वसंतोत्सवाला फाल्गुन पौर्णिमेपासून प्रारंभ होत असल्याचे सर्व पंचांग व दिनदर्शिकांमध्ये नोंद आढळते. रंगपंचमीपर्यंत चालणारा रंगोत्सव हाच वसंतोत्सव आहे, असे तर अभिप्रेत नसावे? नाहीतर हे एक न उलगडणारे कोडेच म्हणावे लागेल!

सर्वांना वसंतोत्सवाच्या आनंददायी हार्दिक शुभेच्छा .

# चिरादेवी जि.प.शाळेत शालेय संगणक साक्षरता अभियान

**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा चिरादेवी येथे सध्याची तांत्रिक प्रगती पाहता सर्व पालक आपल्या मुलांचे प्रवेश खाजगी शाळेत घेऊ लागले आहेत. त्यामुळे गावातील व तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची संख्या व विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चाललेली आहे. त्याकरिता मुलांना शिक्षणाची गोडी वाढवता यावी व वाढत्या तंत्रज्ञानाचा अनुभव प्राथमिक वर्गापासूनच घेता यावा हे या उपक्रमाचे उद्देश समोर ठेवून हेल्पिंग हॅन्डने ही सुरुवात केली आहे.




सदर उपक्रमाला उद्घाटक म्हणून चिरादेवी गावच्या सरपंच मेश्राम आणि शाळेतील शिक्षक मुसळे उपस्थित होते. जवळपास ३८ मुलांचा उत्तम प्रतिसाद लाभला, हा उपक्रम प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत चालणार आहे. सदर उपक्रमात संस्थेतील कृतांत सहारे, सोनल उमाटे, अंकित तोडे, सागर निरंजने,रीता सहारे, मनोज पेटकर, स्वप्निल मत्ते, निखिल उंबरकर, दीपक कावटे, पंकज खामनकर, कार्तिक गनफाडे व इतर सदस्य होते.

# संघाच्या अध्यक्षपदी ॲड.मिलींद रायपूरे तर सचिवपदी ॲड.विजय मत्ते



**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुका अधिवक्ता सघाच्या दिनांक २२ मार्चला निवडणूक पार पडलेल्या निवडणुकीत ॲड.मिलिंद रायपूरे हे ४९ पैकी ३५ मते घेवून तालुका अधिवक्ता संघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले तर ॲड.विजय मत्ते सचिव म्हणून निवडून आले.सदर निवडणूक प्रक्रियेत ड एम. आर. शेख यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम केले, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड.किशोर धोटे, व ॲड.ओमप्रकाश चौधरी यांनी काम पाहिले. त्यांच्या या विजयाचे ॲड.उदय पलिकुंडवार,ॲड.भूपेंद्र रायपुरे,ॲड.प्राशिष ताठे,ॲड.कुणाल पथाडे,ॲड.सुनील नामोजवार,ॲड.अर्चना आगलावे, ॲड.राजू सपकाळ,ॲड.भडगरे,ॲड.कविश्वर चालखुरे व अन्य सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

# उन्हाचा चटका वाढला, पारा ४० अंशांच्या पुढे:तापमानात आणखी वाढ होणार, तर गुढीपाडव्यानंतर हलक्या पावसाची शक्यता



**पुणे**-राज्यात उन्हाच्या झळा तापदायक ठरू लागल्या आहेत. तापमानाचा पारा चाळीशीकडे वाटचाल करत आहे. मालेगावमध्ये राज्यातील उच्चांकी ४०.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दरम्यान, आजही राज्यात उन्हाची ताप, उकाडा वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

विदर्भापासून उत्तर केरळपर्यंत समुद्र सपाटीपासून १.५ किलोमीटर उंचीवर हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. राज्यात आकाश स्वच्छ होत असून, सुर्यप्रकाश थेट जमीनीवर आल्याने उन्हाच्या झळा वाढू लागल्या आहेत. उकाड्यात वाढ झाल्याने घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. शनिवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत मालेगाव येथे राज्यातील उच्चांकी ४०.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यापाठोपाठ अकोला, वाशीम, यवतमाळ आणि जळगाव येथे तापमान ३९ अंशांच्या पुढे गेले आहे.

दरम्यान, सध्या सोशल मीडियावर अवकाळीच्या चर्चा सध्या सुरू आहेत. मात्र राज्यात सध्या तरी अवकाळी पावसाची शक्यता नसल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. मात्र २८ मार्चपासून ३१ मार्च दरम्यानच्या चार दिवसात विदर्भ मराठवाड्यात केवळ ढगाळ वातावरणाची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हंटले आहे.तसेच एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात गुढीपाडवा झाल्यानंतर दोन दिवसांनी ते रामनवमीपर्यंत राज्यातील काही भागांत अवकाळी पावसाची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. यात प्रामुख्याने मुंबईसह कोकण वगळता खान्देश नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे. तर मराठवाडा, विदर्भात ढगाळ वातावरण राहून किंचित तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे.पुणे ३७.५, नगर ३५.९, धुळे ३८.०, जळगाव ३९.०, कोल्हापूर ३५.७, महाबळेश्वर ३१.३, नाशिक ३६.९, निफाड ३६.०, सांगली ३६.८, छत्रपती संभाजीनगर ३७.६, नांदेड ३७.८, परभणी ३८.८, अकोला ३९.८, अमरावती ३८.६, चंद्रपूर ३८.६, गडचिरोली ३५.२, गोंदिया ३५.०, नागपूर ३७.३, वर्धा ३८.१, वाशीम ३९.६, यवतमाळ ३९.५.

# जागतिक जल दिनानिमित्त बुद्धेहाळ येथे श्रमदान व रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**बुद्धेहाळ । वार्ताहर**

जागतिक जल दिनाचे औचित्य साधून बुद्धेहाळ गावा मध्ये रक्तदान शिबिर त्याचबरोबर श्रमदान ही करण्यात आलं - वीं धनवडे मॅडम भारत सरकार नोटरी मिळाले बद्दल गावच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला तसेच बुद्धेहाळ गावचे पोलीस पाटील गणेश लवटे यांचा जिल्हा पलीस पाटील संघटना पदी निवड झाल्या बद्दल नागरी सत्कार करण्यात आला गावातील युवा वर्ग आणि एकंदरीतच सर्वांनी या कार्यक्रमासाठी खूप चांगला प्रतिसाद दिला यावेळी धनवडे मॅडम यांनी कायदा सुव्यवस्था आणि आत्ताची सद्य परिस्थिती यावर युवा कार्यकर्ता आणि सज्ञान नागरिक म्हणून , संविधानिक मूल्यांना धरून आपली कर्तव्य जबाबदारी याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केलं तसेच सचिन लवटे जलतज्ञ कोरो इंडिया यांनी रक्तदानाबरोबर , श्रमदान व पाण्याचे महत्व ही किती महत्त्वाचा आहे हे समजावून सांगितले तसेच भविष्यात पाणी टंचाई येऊ नये म्हणून आता पासूनच कमी पाण्याची शेती , परसबाग , व जलसंधारण कामाला प्राधान्य दिले पाहिजे व किमान पाण्याचे पाणी सुरक्षित केले पाहिजे येणाऱ्या काळात दुष्काळ जन्य परिस्थिती निर्माण होऊ शकते त्यामुळे आता पासून सजग राहिले पाहिजे पाणी आणि आरोग्य , पाणी आणि शिक्षण , पाणी आणि अर्थकारण ,समाजकारण पाणी आणि महिला यांचे महत्व समजुवून सांगण्यात आले तसेच बुद्धेहाळ गावच्या आरोग्य सेविका सविता रुपनर मॅडम यांनी रक्तदान कोणी करावं आणि कोणी करू नये रक्तदान करण्यापूर्वीची काळजी आणि रक्तदान केल्यानंतरची काळजी तसेच रोगराई होऊ नये हेल्दी आरोग्य टिप्स देण्यात आल्या ,तसेच प्रमुख पावणे म्हणून प्रिंयका कोळी ,सरपंच सुगधा श्रीमंत गवंड , या कार्यक्रमास ग्रामपंचायत बुद्धेहाळ , मैत्री फाउंडेशन , रेवनील ब्लड बँक , अर्जुन जावीर , देवा लवटे , गजानन जावीर , अशोक कोळेकर , आणासो लवटे, अशा सेविका सविता करांडे , अशा सेविका अर्चना होवाळ , सतीश लवटे , विजय काळे , बाबासाहेब हिप्परकर, लव्हु गवंड , विश्वास लवटे , यशवंत लवटे , देवया लवटे ,नंदा होवाळ,जयशिंग लवटे ,संपत लवटे , रावसाहेब आलदर , रुपाली गवंड , अंकुश गळवे ,अर्जुन गुरव , अधिनाथ जावीर , किरण शिंगाडे , दादासो कोळेकर ,लक्ष्मी घाडगे अशा सेविका हातीद, इत्यादी व्यक्तींनी कार्यक्रम पार पाडण्यासाठी प्रयत्न केले



# प्रकाश आंबेडकर यांचे अखेर ठरले २७ तारखेला अकोल्यातून अर्ज भरणार

**मुंबई**-२७ तारखेला अकोल्यातून अर्ज भरणार आणि वंचित पक्षाच्या वतीने लढणार असे अखेर वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केले आहे. तसेच महाविकास आघाडीने दिलेल्या त्यांच्या चार जागा त्यांना त्यांच्या चार जागा परत करतोय असेही ते म्हणाले. गेल्या काही दिवसांपासून वंचित आणि महाविकास आघाडीमध्ये सामील होणार असल्याच्या चर्चा होत्या. त्यासाठी नेत्यांच्या बैठका देखील पाड पडल्या. मात्र जागावाटपाचा तिढा न सुटल्याने आंबेडकर यांनी युती तुटल्याची घोषणा केली.

आज आंबेडकर यांनी प्रसार माध्यमांसमोर आपली नाराजी बोलून दाखवली आहे. ''आमच्या मागणीला फार काही प्रतिसाद मिळाला नाही. आम्हाला कुठेतरी सामावून घ्यायच म्हणून त्यांचा प्रयत्न चालू आहे. त्यांचा निर्णय अद्याप झालेला नाही. आमचाही निर्णय झालेला नाही. मविआमध्येच काही मतदार संघांबाबत मतभेद आहेत. काँग्रेसने उमेदवार यादी जाहीर केली. पण मतभेद असलेल्या मतदारसंघातील उमेदवार जाहीर केलेले नाहीत. काही मतदारसंघांवर शिवसेनेने दावा केला. त्यांच्याकडून पुन्हा प्रस्ताव आला तर पुन्हा चर्चा करू'', असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# सर्वांनी एकत्र येऊन भाजपाचा सुफडासाफ करा

**इंदापूर । प्रतिनिधी**

दि.२३ रोजी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा इंदापूर ,पुणे येथे पार पडला यावेळी खा.शरद पवार बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीपुर्वी शेतकर्यांना अनेक आश्वासने दिली, परंतु त्यांची अंमलबजावणी केली नाही.शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन मोदी सरकारने दहा वर्षापुर्वी दिले होते,परंतु २०२४ उजाडला तरी काहीच झाले नाही.दुधाला भाव नाही, अजून अनुदान नाही, शेतमालाला भाव नाही,कांद्याचे भाव खाली आले,कांदा उत्पादक शेतकरी रस्त्यावर आला, तरीही या सरकारचे लक्ष नाही.कांदा हे शेतकर्याचे जिरायत पिक आहे.त्याला कधीतरी भाव मिळतो.परंतु काद्याचेही भाव यांनी खाली आणले.हे चुकीचे धोरण या सरकारचे आहे.इमानदार शेतकरी टिकवायचा असेल तर त्याच्या मालाला भाव मिळणे गरजेचे असुन ज्यांच्या हातात सत्ता आहे,त्यांना शेतकर्याच्या प्रश्नांची जाण नसल्याचा आरोप माजी केंद्रिय कृषि मंत्री शरद पवार यांनी इंदापूर येथे शेतकरी मेळाव्यात बोलताना भाजपा सरकारवर केला. हे सरकार करतय काय तर विरोधकांना अडचणीत आणतय,शिवसेनेचे संजय राऊत हे सरकारच्या विरोधात बोलले म्हणुन त्यांना तुरूंगात टाकले.झारखंड,दिल्लीच्या मुख्यमंत्र्याना तुरूंगात टाकले.ज्यांनी दिल्लीत सर्वसामान्य जनतेसाठी सुसज्ज दवाखाने,शाळा काढल्या,ते पाहण्या साठी देश विदेशातुन लोक दिल्लीत येत आहेत. तेच केजरीवाल आज तुरूंगात आहेत.केजरीवाल यांनी



मागील निवडणुकीत ८० पैकी ७८ विधानसभेच्या जागा निवडून आणल्या,म्हणजे ९८ टक्के जागा निवडून आणल्या.आज त्याच केजरीला यांचेवर दडपशाही सत्ताधार्यांनी सुरू केली आहे.दिल्ली,पंजाब, हरियाणातील शेतकरी दिल्लीत येवुन प्रश्न मांडतात.त्यांचे सारख आपणही करायचे असेल तर आपल्याला एकजुटीने एकत्र यावे लागेल.हा संकटाचा प्रसंग असुन भारतीय जनता पार्टीचा पराभव केला पाहिजे असे पवार म्हणाले.एक वेगळी स्थिती सध्या देशात आहे.देशाचा कारभार व राज्याचा कारभार कुणाच्या हातात द्यावा हा प्रश्न आमच्या सगळ्यांच्या समोर आहे.भाजपाच्या हातात देशाची सत्ता आहे.लोकशाहीमध्ये सत्ता मिळणे आणी ती सत्ता लोकांच्यासाठी वापरण यात काही गैर नाही.पण सत्तेचा वापर करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तुम्हाला आम्हाला सर्वांना घटनेच्या आधाराने मुलभुत आधार दिला त्या संविधानावर आणि तुमच्या अधिकारावर हमला होण्याची शक्यता असली तर त्याच्यासाठी सावध आणी जागरूक राहण्याची आवश्यकता आहे.या सरकारने आनेक घोषणा,अनेक आश्वासने आपल्या सर्वांना दिली परंतु त्याची अंमलबजावणी मात्र केली नसल्याचे शरद पवार यांनी सांगीतले.याप्रसंगी शिवसेनेचे खा.संजय राऊत,काँग्रेसचे बाहळासाहेब थोरात,खा.सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार,आमदार संजय जगताप,राजेंद्र पवार, शर्मिला पवार,जगनाथ शेवाळे,अमोल भिसे,अँड.राहुल मखरे,सागर मिसाळ इ.प्रमुख उपस्थित होते. याठिकाणी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# बारामतीच्या पै.भारत मदने कडून दिल्लीचा पै.मनोजकुमार चित्रपट

## रावणगावच्या आखाड्यात भारत मदने नी पटकावले १११११११ रुपये बक्षीस

**दौंड । प्रतिनिधी**

रावणगाव (ता.दौड) येथील भव्य निकाली कुस्त्यांच्या स्पर्धेत मुंबई महापौर केसरी भारत मदने याने दिल्लीच्या मनोज कुमार याला चितपट करत बाजी मारली. त्याला १ लाख ११ हजार १११ रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

दिवंगत विनोद गाढवे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून ग्रामस्थ व सिंहगड प्रतिष्ठानने या कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. पै. अमर गाढवे, प्रा. रमेश आटोळे, विजय दिवटे यांनी स्पर्धेसाठी परिश्रम घेतले. द्वितीय क्रमांकाच्या ९९ हजार ९९९ रुपयांच्या बक्षिसांकरिता पै. विक्रम घोरपडे (दिल्ली) विरुद्ध पै. मनीष रायते (पुणे) यांच्यातील कुस्ती बरोबरीत सुटली. आमदार राहुल कुल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.माजी उपसभापती राजेंद्र कोंडे,संजय काळभोर, मानसिंग गाढवे, दत्तात्रय गाढवे, संपत आटोळे, महेश शितोळे,भाजपाचे अरुण आटोळे, नीलेश पोमणे, संजय गाढवे, शिवाजी आटोळे,अझरुद्दीन शेख,किरण बिडवे ईत्यादी



प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

रावणगाव येथील प्रथम क्रमांकाची कुस्ती आमदार राहुल कुल व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते लावण्यात आली. या कुस्ती मैदानाचे वैशिष्ट्य म्हणजे महिला कुस्तीगीरही या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. महिला कुस्तीसाठी चांदीची गदा व रोख ५१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. निर्णायक कुस्तीत रावणगावची कन्या पै. समृद्धी आबा जरांडे हिने नंदिनी घोगरकर हिला चितपट करीत मानाची गदा पटकावली.यांच्यासह अनेक मान्यवर व कुस्तीशौकीन या वेळी उपस्थित होते. पंच म्हणून दत्तात्रय गायकवाड, शहाजी आटोळे,विनोद शितोळे,आबा जरांडे यांनी, तर निवेदक म्हणून बापू कुंभार यांनी काम पाहिले.याठिकाणी कुस्त्या पाहण्यासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पाटोदा रोजगार सेल तालुकाध्यक्षपदी दगडखैर यांची निवड

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी/पाटोदा/शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब काका आजबे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष दिपक दादा घुमरे व राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष विजयसिंह बाळा बांगर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पाटोदा रोजगार सेल तालुकाध्यक्षपदी अनिल दगडखैर यांची निवड करण्यात आली. या वेळी राष्ट्रवादी ओबीसी सेलचे अध्यक्ष अशोक बांगर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सेल अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, नानासाहेब कवठेकर, अंगत भोंडवे, अविनाश पवार, अंगद घुमरे, बंडू सवासे, मंगेश पवार, माजी उपसरपंच बाळासाहेब बांगर, राष्ट्रवादी काँग्रेस युवक सोशल मीडिया तालुकाध्यक्ष अक्षय बांगर यांची उपस्थित होती. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या पाटोदा तालुकाध्यक्ष रोजगार सेल पदी अनिल दगडखेर यांची निवड झाल्याने त्यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाला अच्छे दिन येणार असुन अनिल दगडखेर हे शुध्द चारित्र्याचे आणी शाहु, फुले, आंबेडकर चळवळीतील खंबीर नेतृत्व असल्याने पक्ष



वाढीस त्याची मोठी मदत होणार आहे. सर्व सामान्य नागरिक, शेतकरी यांच्या विविध प्रश्नांसाठी अनिल दगडखैर यांनी आवाज उठवला असल्यामुळे तालुकाभरात त्यांची चांगली ओळख असल्याने पाटोदा राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाला धाडसी व सर्व समाजात मिळुन मिसळून चालणारा चेहरा मिळाला असल्याने येणाऱ्या जिल्हा परिषद, लोकसभा व विधानसभा निवडणूकीत याचा मोठा फायदा होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पाटोदा तालुकाध्यक्ष रोजगार पदी अनिल दगडखैर यांना पदाचा पदभार देण्यात आला. या वेळी अनिल दगडखैर बोलताना म्हणाले की गोर गरीब जनतेची कामे पक्षाच्या माध्यमातून मार्गी लावणार तसेच आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत ही सर्वच जागेवर पक्षाचे उमेदवार निवडुन आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनियुक्त अध्यक्ष अनिल दगडखैर यांनी सांगितले. त्यांच्या या निवडी बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## भाजपचे मागील दोन्ही खासदार अकार्यक्षम

# मला ईडीची भीती नाही; मी भाजपच्या विरोधात बोलणारच-आ.प्रणिती शिंदे




**सोलापूर (वृत्तसंस्था)**–भाजपचे मागील दोन्ही खासदार अकार्यक्षम ठरले म्हणून त्यांना त्यामुळे प्रत्येकवेळी त्यांना उमेदवार बदलावा लागला आणि आता तर त्यांना कोणी सापडतच नाहीये, असा टोला काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी लगावला आहे.दरम्यान काँग्रेसच्या आमदार प्रणाती शिंदे म्हणाल्या की, माझ्याकडे सोसायटी, बँक आणि कारखाना नसल्यानी ईडीबिडीची भिती नाहीये, त्यामुळे मी भाजप विरोधात बोलणारच, असे म्हणत त्यांनी भाजपवर हल्ला चढवला. सोलापूर जिल्ह्यातील होटगीमध्ये बोलत असताना त्यांनी भाजपवर टीकास्त्र डागले आहे.

सोलापूर काँग्रेसच्या लोकसभा उमेदवार प्रणिती शिंदे म्हणाल्या की,यंदाची निवडणूक ही 'करेंगे या मरेंगे' अशी आहे. लोकशाही आणि संविधान संपावण्याचा डाव भाजप मोदी करत आहेत. कालच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली. त्यासोबतच काँग्रेस पक्षाची सर्व खाती गोठवण्यात आली. एक महिन्यापूर्वी झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना अटक करण्यात आली. काँग्रेसचे डी.के.शिवकुमार यांना ही अटक करण्याची शक्यता आहे. विरोधी पक्षाला संसदेत बोलू देत नाहीत. त्यांचे माईक बंद करतात. ही लोकशाही आहे की हुकूमशाही?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.प्रणिती शिंदे म्हणाल्या, पेट्रोल पंपावर गेले की मोदींचे मोठंमोठे पोस्टर्स दिसतात, व्हाट्सअपवर त्यांचे पोस्टर्स, टीव्ही – रेडिओ लावला की त्यांची जाहिरात. तुम्हाला एवढे खोटे बोलून वेड्यात काढत आहेत. निवडणूकीच्या तोंडावर २ रुपयांनी पेट्रोलचे भाव कमी करून भाजप लोकांना वेड्यात काढत आहे. तरी पण आपण जर भाजपला मतदान केले तर आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेऊ, असेही त्यांनी म्हटले आहे.

# माढा लोकसभा मतदार संघात शेकापचे नेते डॉ.अनिकेत देशमुख यांच्या नावाचीच चर्चा

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुका हा शेतकरी कामगार पक्षाचा बाल्लेकिल्ला समजला जातो. कै.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांनी ५० ते ५५ वर्षाच्या राजकारणात सांगोला तालुक्याच्या बाहेर सोलापूर व सातारा जिल्ह्यात अनेक विकासाची कामे व पिण्याचे व शेतीचे पाणी प्रश्न सोडवण्यासाठी विधानसभेत वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. तसेच अनेक नेते मंडळी यांच्याशी स्नेहपूर्वक व मैत्रीपूर्ण संबंध जोपासल्यामुळे सोलापूर व सातारा जिल्ह्यातील सर्व पक्षाची नेतेमंडळी व मतदार वर्ग हा नेहमीच कै.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख उर्फ आबासाहेब यांच्या पाठीशी भक्कम उभा राहिला आहे. प्रत्येक वेळी शेतकरी कामगार पक्षाने घेतलेल्या भूमिकेला माढा लोकसभा मतदार संघातील जनतेने सकारात्मक कौल दिलेला आहे. त्यामुळेच ह्या गोष्टीचा धागा पकडून शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी कै.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांचे नातू डॉ.अनिकेत देशमुख यांची उमेदवारी माढा लोकसभेसाठी



इंडिया आघाडीकडे मागितलेली आहे. डॉ अनिकेत देशमुख हे सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला ह्या नामांकित शिक्षण संस्थेचे विद्यमान संचालक असून त्यामाध्यमातून त्यांनी अनेक शैक्षणिक कामे केलेली आहेत. डॉ. अनिकेत देशमुख यांनी वैद्यकीय क्षेत्रात अनेक शस्त्रक्रिया योजनेच्या माध्यमातून करून लोकांची सेवा केलेली आहे. सांगोला तालुक्यासह आसपासच्या तालुक्यातील पाणी प्रश्न, दुधाचा प्रश्न, विजेचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सरकारला व प्रशासनाला निवेदन देऊन व त्याचा पाठपुरावा करून तसेच प्रसंगी आंदोलन करून ते प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. डॉ. अनिकेत देशमुख हे २०१९ ला सांगोला विधानसभेचे शेकापचे उमेदवार होते त्यावेळी त्यांना १ लाखाच्या आसपास मते मिळाली होती व त्यांचा अवघ्या ७६८ मताने निसटता पराभव झाला होता. एकूण सर्व मतदारांचा विचार करता डॉ. अनिकेत देशमुख यांनाच लोकांची पसंती असल्याचे दिसून येत आहे. सध्या भाजप आघाडीला असणारा शेतकऱ्यांचा रोष, मराठा व धनगर समाज्याच्या आरक्षणाचा रोष याचा फायदा इंडिया आघाडीला मिळू शकतो. इंडिया आघाडीला डॉ अनिकेत देशमुखसारखा तरुण, तडफदार व उच्चशिक्षीत चेहरा मिळाला तर डॉ. अनिकेत देशमुख हे विक्रमी मताने निवडून येऊ शकतात. या सर्व गोष्टीचा विचार करता डॉ. भाई अनिकेत देशमुख यांनाच उमेदवारी द्यावी अशी जनतेतून मागणी होत आहे.

# उत्पादन वाढीसाठी सेंद्रिय खतांचा वापर आवश्यक–राजेंद्र चव्हाण

**सांगोला । प्रतिनिधी**

ग्रामीण भागामध्ये ऊस उत्पादक शेतकरी चांगल्या प्रकारचे कष्ट करून उसाचे उत्पादन घेवू शकतो. उसाच्या उत्पादन वाढीसाठी सेंद्रिय खतांचा वापर आवश्यक असून प्रती एकरी १०० टन उसाचे उत्पादन घेणे शक्य असल्याचे राजेंद्र चव्हाण यांनी सांगितले.

सुस्ते ता.पंढरपूर येथे जैविकॉन राजलक्ष्मी ऑरगॅनिक्स या कंपनीच्या माध्यमातून ऊस पीक व्यवस्थापन याविषयी चर्चासत्राच्या आयोजन करण्यात आले होते. सेंद्रिय शेती व विषमुक्त शेतीचे प्रसार करणारे तज्ञ अभ्यासक संतोष गोसावी म्हणाले, रासायनिक खताचां अधिक व सातत्याने वापर केल्यामुळे जमिनीचा पोत बिघडतो. परिणामी जमिनीची उत्पादकता कमी होते. रासायनिक खतांप्रमाणे किटकनाशकांच्या वापराचेदेखील अनिष्ट परिणाम होत असल्याचे दिसून येत आहेत.रासायनिक खतांच्या वापरातून जमिनीच्या पोतावर होणारा दुष्परिणाम टाळणे, पिकांच्या दर्जावर व पर्यायाने आपल्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळणे,



**एकरी उसाची संख्या ४० ते ४५ हजारांच्या आसपास असावी. प्रत्येक उसाचे वजन दोन ते तीन किलो पर्यंत मिळाले तरच एकरी शंभर टन किंवा त्यापुढे उत्पादन मिळते. आतापर्यंत ८० ते ९० टनापर्यंत उत्पादन साध्य झाले आहे. यावर्षी शेतकऱ्यांनी १०० टन ऊस उत्पादनाचा पल्ला गाठला आहे. त्यांचा ऊस उत्पादनाचा एकरी खर्च ६० ते ७० हजार रुपयांपर्यंत आहे. – अजयसिंह इंगवले, जैविकॉन राजलक्ष्मी ऑरगॅनिक्स प्रा. लि.**

किटकनाशके व तणनाशके यांचाही पिकांवर व पर्यायाने आरोग्यावर होणारा दुष्परिणाम टाळणे या उद्देशातून सेंद्रीय शेती ही संकल्पना पुढे आली असल्याचे त्यांनी सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर विजयसिंह इंगवले, सुस्ते गावचे माजी सरपंच बाळासाहेब लोकरे, माजी उपसरपंच दिलीप चव्हाण, संजय गाडगे. राजेंद्र चव्हाण, पोपट चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, किसान ऑरगॅनिकचे गोरख ननवरे, पंढरपूर मंगळवेढा विभागाचे प्रतिनिधी राहुल जानकर यांनी परिश्रम घेतले.

# 'बुलेट ट्रेन'च्या गतीने होईल देशाचा विकास-ना.सुधीर मुनगंटीवार

## संसद भवनात छत्रपतींचे स्मारक उभारण्याचे स्वप्न ;आरोग्याची गंगोत्री 'दिल्ली-व्हाया-मुंबई' पोहोचावी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यंदा लोकसभेची निवडणूक ऐतिहासिक ठरणार असून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा विकासाचा झंझावात बघता देशाच्या विकासाची गाडी 'बुलेट ट्रेन'पेक्षा वेगाने धावेल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री व चंद्रपूर मतदारसंघाचे लोकसभेचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

योगनृत्य परिवार ट्रस्ट, चंद्रपूरतर्फे विविध राज्य व राष्ट्रीय पातळीवर उपक्रम राबवून सांस्कृतिक क्षेत्राचा गौरव वाढवणारे सुधीर मुनगंटीवार यांचा शनिवार, २३ मार्च रोजी जाहीर सत्कार करण्यात आला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालय सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात ना. सुधीर मुनगंटीवार यांनी योगनृत्य परिवारचे गोपाल मुंदडा व चमूच्या कार्याचे कौतुक केले. योगनृत्याच्या माध्यमातून आरोग्याची गंगोत्री चंद्रपुरातून वाहायला सुरुवात झाली असून ती मुंबईत पोहोचली आणि मी जर खासदार म्हणून निवडून आलो तर ती दिल्लीपर्यंत पोहोचेल असा निर्धार ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. रयतेचे राज्य हा लोकशाहीचा आत्मा असून दिल्लीचा तख्त राखणा-या छत्रपतींची खासदारांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने संसद भवनात वीर राजे छत्रपतींचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचा मानस ना. मुनगंटीवार यांनी बोलून दाखवला. देशभरात कौतुकास पात्र ठरलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील सैनिक शाळा, बॉटनिकल गार्डन, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, आदिवासी विद्यार्थ्यांचे मिशन शौर्य, सियावर रामचंद्र की जय, ग्रीन भारतमाता गिनेस बुकमध्ये नोंद चंद्रपूरचे नाव देशात पोहचले आहे या सर्व उपक्रमाची इतिहासात नोंद होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'गिनिज बुक'मध्ये झळकला चंद्रपूर जिल्हा हजारो दिव्यांच्या रोशनाईने उजळलेले 'सियावर रामचंद्र की जय' हे शब्द आणि हिरव्या रोपट्यांनी सजलेली ग्रीन भारतमाता या दोन्ही उपक्रमांमुळे चंद्रपूर जिल्ह्याचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवले गेले. अफजल खानाचा कोथडा छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वाघ नखांनी काढला ती ऐतिहासिक वाघनखे भारतात परत आणण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. शिवाय, चंद्रपूर जिल्ह्यातील काष्ठ अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर व संसद भवनासाठी वापरणे, 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' ला राज्यगीताचा दर्जा देण्यातही ना. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे दुर्लक्षित राहिलेल्या सांस्कृतिक क्षेत्राला झळाळी मिळाली.



# आपणच उमेदवार आहोत या भावनेने निवडणुकीत काम करा-ना.मुनगंटीवार

## विजय संकल्पाची मशाल पेटविण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन

**राजुरा । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला लोकसभा निवडणूक लढण्याची संधी दिली हे माझे भाग्य आहे. त्यांचा विश्वास सार्थकी लावण्यासाठी माझ्या कार्यकर्त्यांना विजय संकल्पाची मशाल पेटवावी लागेल. त्यासाठी माझ्या प्रत्येक कार्यकर्त्याने आपणच निवडणुकीत उमेदवार आहोत या भावनेने काम करावे, असे आवाहन महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री व चंद्रपूर मतदारसंघाचे लोकसभेचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

राजुरा विधानसभा पदाधिका-यांची बैठक शनिवार, २३ मार्च रोजी नक्षत्र लॉन, राजुरा येथे पार पडली. या बैठकीला ना. सुधीर मुनगंटीवार संबोधित करत होते. 'एक रुपयांचा आशीर्वाद' हा उपक्रम राजुरा विधानसभा क्षेत्रात तुम्ही शंभर टक्के यशस्वी केला. हा एक रुपया जनतेकडून मिळालेला मोलाचा आशीर्वाद असून यामुळे आपले बळ वाढले आहे. आता कोणीही विरोधात लढले तरी चिंता नाही,' अशी गर्जनाही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली. काँग्रेसचे राजकारण हे मायावी रावणासारखे असून खोटे बोलून मुस्लिम समाजाला भडकविण्याचे काम ते करीत आहेत. मात्र भारतीय जनता पक्षाने मुस्लिम समाजासाठी जितके काम केले तितके आजपर्यंत कोणत्याच पक्षाने केलेले नाही. त्यामुळे काँग्रेसच्या खोट्या प्रचाराला मतदार बळी पडू नका, असे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले.




### ये दोस्ती... हम नही तोडेंगे

**प्रत्येक बूथ वर शिंदे-गट, आठवले-गट आणि आपल्या सहकारी पक्षांसोबत मित्रत्वाची भावना ठेऊन आपण जोमाने कामाला लागावे, असे सांगताना ना. मुंगंटीवार यांनी ये दोस्ती... हम नही तोडेंगे म्हणत प्रत्येक कार्यकर्ता एकत्रिक काम करण्याच्या भावनेने पुढे यावा, असे म्हणत कार्यकर्त्यांमधला उत्साह वाढवला.**

# संध्याकाळी होळी पेटली लोक जागती तीला गा...

## गिरगावच्या फागव्यातून घडते संस्कृतीचे दर्शन



**तळोधी (बाळापुर) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील शेवटचे गाव असलेल्या गिरगाव येथे पारंपरिक फागव्याचा दिंडीचे आयोजन अनेक वर्षांपासून पिढ्यानपिढ्या सुरू आहे.गिरगाव येथिल सच्चिदानंद मंडळ गिरगाव यांच्या होलिकोत्सव आजच्या आधुनिक काळात पण पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो.

होळीच्या दिवशी परंपरेप्रमाणे मकर चौकात गजानन मंदिर समोर होळी पेटविल्या जातेआणि दुसऱ्या दिवशी परंपरेप्रमाणे पारंपरिक ढोलकी,चिपळ्या, झांज इत्यादी वाद्य घेऊन मंडळाचे तरूण बाल वृद्ध मंडळी, भजन मंडळी , सायंकाळी होळी पेटली लोक जागती तीला गा अशाप्रकारचे बोलीभाषेतील भजन म्हणत गावभर दिंडी काढण्यात येते.घराघरात जाऊन रंग लावल्या जातो.आणि स्वखुशीने देण्यात येणारी देणगी स्विकारली जाते. संपूर्ण गाव फिरुन आल्यानंतर गजानन मंदिरात गोळा झालेले पैसे यांचा हिशोब करून त्याच पैशाने संध्याकाळी गावातील स्त्रिया, पुरुषांसाठी चहापाण्याचे आयोजन करण्यात येते आणि उरलेल्या पैशातून समाजोपयोगी वस्तू घेण्यात येतात. आधुनिक काळात सगळीकडे रंगपंचमीच्या दिवशी डिजे च्या तालावर मद्य प्राशन करून धांगडधिंगा घातला जात असताना सच्चिदानंद मंडळाने अजुनही परंपरा कायम ठेवली आहे, रंगपंचमीच्या निमित्ताने समाजात फोफावत चाललेला धांगडधिंगा बघता या मंडळाने जोपासलेल्या परंपरेचा आदर्श घेण्यासारखे आहे.

# शासकीय हत्ती कॅम्पमध्ये आणखी एका हत्तीची भर

## होळीच्या दिवशी पर्यटकांना मिळाली गोड बातमी



### अजित आणि राणीचे अपत्य

अजित हत्ती हे महालिंगा आणि व बसंतीचे अपत्य असून ७ जुलै १९९४ ला त्याचा जन्म याच हत्तीकॅम्प मध्ये झाला.अजित सध्या ३० वर्षाचा आहे.तर राणी नामक हत्ती हे अजित आणि मंगलाचे अपत्य आहे.१० मार्च २००८ रोजी राणी हत्तीचा जन्म याच हत्तीकॅम्प मध्ये झाला होता.राणी आता १६ वर्षाची असून त्याचा हा पहिला खेप आहे. विशेष म्हणजे या हत्ती कॅम्प मधील अजित नामक हत्तीचे सर्वात जास्त अपत्य आहेत.आता परत एक मादी हत्तीची भर पडली असून अजित आणि राणी हत्तीचे हे अपत्य आहे.

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अहेरी तालुक्यात असलेल्या कमलापूर येथील हत्ती कॅम्प मध्ये राणी नावाच्या हत्तीनीने ऐन होळीच्या पर्वावर (२४ मार्च) रोजी एका मादी पिलास जन्म दिला त्यामुळे या शासकीय हत्ती कॅम्प मधील हत्तींची संख्या नऊ झाली आहे.यापूर्वी येथे एकूण आठ हत्ती होते. रविवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास राणी या हत्तीणीने मादी पिलास जन्म दिला.याची माहिती मिळताच सिरोंचा वनविभागाचे उपवनसंरक्षक पूनम पाटे यांनी भेट देऊन पाहणी केली.राणी नामक हत्तीण व तिच्या पिलाची आरोग्य तपासणी करण्यात आली असून त्याची प्रकृती उत्तम असल्याचे कळते.राणी आणि अजित हत्तीचे हे अपत्य असून या शासकीय हत्तीकॅम्प मध्ये आता आणखी एका हत्तीची भर पडली आहे.


सिरोंचा वन विभाग अंतर्गत येत असलेल्या कमलापूर वनपरिक्षेत्रातील शासकीय हत्ती कॅम्प हे राज्यातील एकमेव हत्तीकॅम्प म्हणून प्रसिद्ध आहे.याठिकाणी अजित,गणेश, बसंती, मंगला, प्रियांका,रूपा,राणी आणि लक्ष्मी नावाच्या दोन नर आणि सहा मादी असे एकूण आठ हत्ती आहेत.दरवर्षी याठिकाणी पर्यटकांची वर्दळ असते.विविध राज्यातील पर्यटक याठिकाणी असलेल्या हत्तीकॅम्प ला भेट देत असतात.होळी पौर्णिमेच्या दिवशी राणी नामक हत्तीणीने एका मादी पिलास जन्म दिल्याने आता याठिकाणी हत्तींची संख्या नऊ वर पोहोचली आहे. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

# सावरगाव येथे बोकडो नदी किनारी वाघिणीचे दर्शन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील पूर्वेस वाढोणा मार्गातून जाणाऱ्या बोकडो नदी किनारी शेतशिवारातील शेतकऱ्यांना वाघिणीचे तिच्या दोन बछड्यांसह शनिवारी (दि.२३मार्च) सकाळी १० वाजताच्या सुमारास दर्शन दिल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.मात्र तळोधी वन परीक्षेत्र विभागाचे वन परीक्षेत्र अधिकारी यांना माहिती मिळताच वन कर्मचाऱ्यांच्या ताफ्यासह ते तात्काळ दाखल झाले.आणि वाघिणीला तिच्या नैसर्गिक अधिवासात हाकलण्यात आले.

तालुक्यातील सावरगाव येथील सावरगाव -वाढोणा मार्गातुन जाणाऱ्या बोकडो नदी किनारी परिसरातील शेतशिवारात अनेक शेतकऱ्यांना वाघीण तिच्या दोन पिल्लांसह फिरताना दिसल्याने शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले.मात्र याबाबत तळोधी वनपरीक्षेत्र विभागाला माहिती मिळताच तातळीने वनपरीक्षेत्र अधिकारी ए.आर.कन्नमवार हे वन कर्मचाऱ्यांच्या ताफ्यासह दाखल झाले.आणि बोकडो नदीकिनारी भटकणाऱ्या वाघिणीला व तिच्या दोन पिल्लाना नैसर्गिक अधिवासात हाकलले. दरम्यान एका शेतकऱ्याला शेतात काम करीत असताना शनिवारी नदी किनारी वाघिणीला प्रत्यक्ष पाहिले असल्याची माहिती गावात पसरताच नदीकिनारी नागरिकांनी हजेरी लावली.दरम्यान ग्रामस्थांनी वाघिणीच्या दोन पिल्लांनी तिथून पळताना दर्शन दिले असल्याची माहिती सांगितली.मात्र तळोधी वनपरीक्षेत्र विभागाच्या वनाधिऱ्यांनी वाघिणीला व पिल्लांना तिच्या नैसर्गिक अधिवासात हाकलले असल्याची माहिती दिली.शिवाय वन कर्मचाऱ्यांची देखरेख सुद्धा या परिसरात ठेवण्यात आली आहे.तरीही या परिसरातील शेतकरी तथा नागरिकांनी सतर्क व सावध राहवे असा इशारा वनविभागाने दिला आहे.



सावरगाव नदी किनारी वाघीण आढळल्याची माहिती मिळताच तातडीने ते स्थळ गाठले व झाडे-झुडपात दडून बसलेल्या वाघिणीला पिल्लांसह तिच्या नैसर्गिक अधिवासात हाकलण्यात आले आहे.तरीही या परिसरातील शेतकऱ्यांनी सतर्क राहावे.

**- ए.आर.कन्नमवार**
**वनपरीक्षेत्र अधिकारी,**
**वन परीक्षेत्र विभाग,तळोधी**
**(बा.)ता.नागभीड**

# नरेंद्र मोदींसोबत अशोक नेते यानांही हॅट्रिकची संधी

## पक्षश्रेष्ठींनी दारवविला पुन्हा विश्वास ;काँग्रेसचे नामदेव किरसान रोखणार भाजपचा विजयरथ ?

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी प्रतिष्ठेची केलेली गडचिरोली- चिमूर लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी अखेर अशोक नेते यांना मिळाली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत खासदार अशोक नेते यांना सुद्धा हॅट्रिकची संधी राहणार आहे.

क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणाऱ्या गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी कडून डॉ. नामदेव किरसान यांना उमेदवारी जाहीर करण्यात आले.तर महायुती मधून विद्यमान खासदार अशोक नेते, अजित पवार गटाचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्यात उमेदवारीसाठी काटे की टक्कर बघायला मिळत होती. दोन्ही नेते मुंबई, दिल्लीत तळ ठोकून बसले होते.अखेर नामांकन अर्ज दाखल करण्याच्या दोन दिवस अगोदर विद्यमान खासदार अशोक महादेव नेते यांनाच उमेदवारी देण्यात आली.भाजपकडून लोकसभेसाठी उमेदवारांची पाचवी यादी जाहीर करण्यात आली आहे यामध्ये गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रासाठी अशोक महादेवराव नेते यांना उमेदवारी दिली आहे.आता महाविकास आघाडी आणि महायुती मध्ये थेट लढत होणार असून डॉ.नामदेव किरसान विरुद्ध अशोक नेते अशी लढत बघायला मिळणार आहे.मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी लोकसभा लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती.मात्र,अखेर भाजपने ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गटाला) न सोडता आपल्याकडेच ठेवलं आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'अबकी बार चार सौ पार' म्हणत हॅट्रिक करण्यासाठी कंबर कसली आहे. त्यांच्यासोबतच गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्रात अशोक नेते यांना हॅट्रिकची संधी आहे.दुसरीकडे महाविकास आघाडीत ही जागा काँग्रेस कडे असून त्यांनी डॉ नामदेव उसेंडी यांना उमेदवारी न देता डॉ नामदेव किरसान यांना संधी दिली आहे. काँग्रेसला भाजपचा विजयरथ रोखण्यात यश येणार का ? याकडे बघणं महत्वाचं ठरणार आहे.क्षअशोक नेते हे २०१४ आणि २०१९ मध्ये सलग दोनदा विजयी झाले.त्यांनी डॉ नामदेव उसेंडी यांचा पराभव केला होता.काँग्रेसने यंदा आपला उमेदवार बदलला असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस डॉ नामदेव किरसान यांना उमेदवारी दिल्याने याठिकाणी महत्वपूर्ण लढत बघायला मिळणार आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .